**इमहाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २१/२०१८-१९/ ९८६ दिनांक: २३.०८.२०१८ (23/08/2018)

**आदेश**

**आदेश केस क्र. २१(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री कृष्णांत हिंदूराव पाटील<br>मु माजनाळ.पो. पुनाळ ता. पन्हाळा जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग कळे | |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

6/6

प्रस्तुतची तक्रार अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या दिनांक १०.०७.२०१८ च्या आदेशाने व्यथित होऊन तक्रारदार श्री कृष्णांत हिंदूराव पाटील, मु.माजनाळ पो. पुनाळ ता. पन्हाळा जि. कोल्हापूर यांनी या मंचाकडे दाखल केली आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

थोडक्यात हकीकत अशी की, श्री कृष्णांत हिंदूराव पाटील, मु.माजनाळ पो. पुनाळ ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथील शेती पंप विज ग्राहक आहेत. त्यांचा विज ग्राहक क्र. २६२३२०००२०२२ हा आहे. त्यांना दिनांक ३१.१२.१९८१ रोजी १५अश्वशक्ती शेती विज पंपाकरिता विज कनेक्शन देण्यात आले.

त्यांना तिमाही विज बिले जून २०१३ पासून Faulty सदरा खाली अवास्तव सरासरीने देण्यात आली. वारंवार विनंती करुन देखील त्यांचे मिटर बदलण्यात आलेले नाही. अखेरीस दिनांक २३.११.२०१५ रोजी त्यांचे मिटर बदलविण्यात आले ,आणि हे मिटर बदलावितांना त्यांना आधी देण्यात येत असलेल्या बिलावर दाखविण्यात आलेल्या नंबरचे मीटर तिथे नसून वेगळयाच क्रमांकाचे मिटर बसविण्यात आले होते, ही बाब दोन वर्षानी लक्षात आली. हया जुन्या मिटरच्या अंतिम नोंदीनुसार पूर्वीची तिमाही बिले म्हणजे जून २०१३ ते सप्टेंबर २०१५ पर्यन्तच्या बिलामध्ये सरासरी ९००० युनिटस् प्रमाणे Adjust करण्यात आली की, ज्यामुळे त्यांना अवास्तव सरासरीने बिले देण्यात येत होती की ती देयके त्यांना भरणे शक्यच नव्हते.

त्यांनी ही बिले निर्दोष आकारणी प्रमाणे सुधारीत करुन द्यावीत व तशी बिले दिल्यास ती भरण्यास ते तयार आहे अशी वारंवार मागणी करुन देखिल त्यांना सुधारीत बिले न दिल्यामुळे त्यांना तक्रार दाखल करावी लागली.

वि.प. कंपनीतर्फे उपकार्यकारी अभियंता श्री एस.पी.पाटणकर, उपविभाग कळे यांनी खालील प्रमाणे स्पष्टीकरण दिले.

१. सदर ग्राहकाचा सी.पी. एल. नुसार मीटर क्रमांक ७००००८०५०८ हा दिसून आला परंतु प्रत्यक्ष मीटर काढले नंतर सदर ग्राहकाचे मीटर वरील क्रमांक ००४५६० असा आढळून आला व पूर्वी पासून सदर ग्राहकाचा ००४५६० क्रमांकाचा मीटरआहे . परंतु सिस्टीमला तो चूकीचा अपडेट दिसून येत आहे त्याची वीज देयके सरासरी व Faulty नुसार गेलेली होती ती मीटर वाचनानुसार योग्य दुरुस्ती करुन देण्यात आलेली आहेत.
२. सदर ग्राहकाचा स्टॅटीक मीटर दिनांक २३.११.२०१५ रोजी बदलण्यात आले होते व ते तपासण्यात दिसून आले नाही.
३. सदर ग्राहकाचे मीटर बदलतेवेळी सुरवातीचे मीटर वाचन ००००५ युन्टि होते.
४. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगानुसार विनिमय कलम २००३ कलम ६.६ नुसार सदर ग्राहकाचा तक्रारी अर्ज दोन वर्षापूर्वीचा असलेने तो विचारात घेणेत येऊ नये.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

618

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०८.२०१८ रोजी हया मंचासमोर घेण्यात आली सुनावणी दरम्यान तक्रारदारांतर्फे श्री कृष्णांत हिंदूराव पाटील ग्राहक स्वतः व श्री तुकाराम भिसे त्यांचे प्रतिनिधी म्हणून तसेच वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता उपविभाग कळे श्री श्री एस.पी.पाटणकर हे उपस्थित होते.

उभय पक्षाचे युक्तिवाद ऐकण्यात आले व दाखल केलेली कागदपत्रे वाचण्यात आली. वरील विवेचनावरुन या मंचाचे निष्कर्षाकरिता खालील प्रश्न उपस्थित होतात.

**वि. प. यांची भूमिका.**

१) तक्रारदार यांना जून २०१३ ते सप्टेंबर २०१५ पर्यन्तची दिलेली सरासरीची त्रैमासिक बिले ही चुकीच्या आकारणीने दिली गेली काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

**कारणमिमांसा**

तक्रारदार श्री कृष्णांत हिंदूराव पाटील मु.माजनाळ पो. पुनाळ ता. पन्हाळा जि. कोल्हापूर हयांचे १५ अश्वशक्ती मंजूर भार असलेले शेतीचे विज कनेक्शन आहे. त्यांना जून २०१३ हया त्रैमासिक बिलापासून सप्टेंबर २०१५ ही सर्व त्रैमासिक बिले ही Faulty सदरा खाली देण्यात आली असून व ती सरासरी प्रमाणे देण्यात आली आहेत ही बाब उभय पक्षांना मान्य आहे. वास्तविक पहाता १५ अश्वशक्ती विज पंपाला ५ रोज ६ तासाकरिता सुरु राहिल्यास त्याचे सरासरी त्रैमासिक बिल हे महत्तम (Maximum) ४००० युनिटस यावयास हवेत परंतु त्यांना ९००० युनिटस्‌ची बिले देण्यात आली आहेत. त्यामुळे ती बिले दुरुस्त करुन मिळावी अशी ते वारंवार वि.प.कंपनीकडे मागणी करीत होते. विज बिले ही मिटर नोंदी प्रमाणे ग्राहकाला देण्यात यावीत. म.वि. नियामक आयोग विनिमय २००५ चे कलम १५.४ नुसार मीटर सदोष असतांना

"अधिनियमाच्या भाग १२ आणि भाग १४ मधील तरतुदींना अधीन राहून, मीटर सदोष असेल तर, तपासणी अहवालाच्या निष्कर्षानुसार तयार करण्यांत आलेले देयक व त्यासोबत तपासणी अहवाल पाठविण्यांत आला असेल तर, मीटर सदोष असल्याचे ज्या महिन्यांत निदर्शनास आले असेल त्या महिन्याच्या मागील जास्तीत जास्त ३ महिन्यांच्या कालावधीतील ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजित करण्यात येईल."

618

GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

इथे नमूद करणे आवश्यक ठरते की, वि.प.कंपनीच्या सि.पी.एल. मध्ये ग्राहकांचा मिटर क्रमांक चुकीचा नोंद करण्यात आला व ती चुक दुरुस्त देखिल केली गेली नाही. त्या दरम्यान ग्राहकाला सरासरी नुसार विज बिल देण्यात आलीत. ही बाब उभय पक्षाला मान्य आहे. ज्यावेळेस तक्रारदाराचे मिटर दिनांक २३.११.२०१५रोजी बदलून नविन बसविण्यात आले त्याच वेळेस वरील बाब वि.प. कंपनीच्या लक्षात आली व वि.प.कंपनीने बदलेल्या मिटरच्या अंतिम मीटर नोंदीनुसार ग्राहकाला एकंदरीत सरासरी प्रमाणे त्रैमासिक बिले दिली हे जूने बदलेले मीटर योग्य होते किंवा नाही हयाबाबत वि.प.कंपनीने त्याचा चाचणी अहवाल किंवा काही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे हया जुन्या मिटरच्या अंतिम नोंदीनुसार दिलेली सरासरी बिले ही योग्यच असतील असे म्हणता येत नाही. तक्रारदाराने त्याच्या लेखी कथनानुसार नविन मीटर प्रमाणे येणारी बिले योग्य असून ती त्यांना मान्य आहेत ही बाब कबूल केली व ती वि.प.कंपनीस देखिल मान्य आहे.

त्यामुळे तक्रारादाराचा सध्या नवीन मिटर प्रमाणे येत असलेला विजेचा वापर आणि वि.प. कंपनीच्या वेबसाईटवरील बिलाच्या मागील वर्षाच्या माहितीचा आधार घेऊन येणारी सरासरी विचारात घेऊन तक्रारदारास सरासरी ३५०० युनिटस् प्रमाणे तिमाहीची बिले द्यावी, असा या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. त्यामुळे प्रश्न क्र. १ चे उत्तर आम्ही होय दिले आहे. सबब आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

## आदेश

१) तक्रारदारची मागणी मंजूर करण्यात येत आहे
२) तक्रारदाराना दिलेली जून २०१३ ते सप्टेंबर २०१५ ची त्रैमासिक बिले ३५०० युनिटस च्या सरासरी नुसार वि.प. कंपनीने दुरुस्त करुन देण्यात यावी.
३) दिलेली विज बिले तक्रारदाराच्या सोयीनुसार सुलभहप्त्यामध्ये भरण्याची मुभा देण्यात यावी.
४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण